# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३०** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २०६** **दिनांक :-०९/१२/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.११/१०/२०२४ शुक्रवार रोजी सकाळी-११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२९ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.११/१०/२०२४ शुक्रवार रोजी सकाळी-११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२९ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.११/१०/२०२४ शुक्रवार रोजी सकाळी-११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२९ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३०** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०२** **प्रशासक ठराव क्र.:- २०७** **दिनांक :-०९/१२/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रमुख वैदयकीय अधिकारी यांचेकडिल जा.क्रं./दवाखाना विभाग/६३८/२०२४-२५ दि.२७/११/२०२४
३. उपायुक्त (सा.क.) यांचा दि.२७/११/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.२७/११/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** आरसीएच फेज - २ अंतर्गत कार्यरत चार वैद्यकीय अधिकारी व एक परिचारीका यांना दि.०२/०१/२०२५ ते ३१/१२/२०२५ या कालावधी खंड देवून एक वर्षाकरीता पुन:र्नियुक्ती देणेबाबत व मानधनात वाढ करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व प्रमुख वैदयकीय अधिकारी, दवाखाना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव अंतर्गत मनपा एकात्मिक आरोग्य कुटुंब सोसायटी (RCH Phase-२) अंतर्गत चार वैद्यकीय अधिकारी हे सन २०१० पासुन तसेच एक परिचारिका सन २००८ पासून कार्यरत आहे. महासभा ठराव क्र.५६ दि.२८/११/२००७ अन्वये सदर RCH Phase-२ योजना राबविण्याकरीता सदर वैदयकीय अधिकारी व परिचारीका यांचे पदे भरण्यास व सदर पदावरील वेतनापोटी सन २००८-०९ मध्ये ५०% सन २००९-१० मध्ये ७५% व एप्रिल २०१० नंतर वेतनावर होणारा संपूर्ण खर्च महानगरपालिका निधीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

RCH Phase-२ अंतर्गत वैदयकीय अधिकारी यांना पत्र क्र.रापुका/अर्बन/ RCH/कक्ष १७/१६७३५-३७/०६ दि.१४/०३/२००६ अन्वये मंजुर पत्रानूसार दै. लोकमत दि.२३/१०/२०१० चे जाहीर प्रसिध्दीनूसार सदरची पदे भरण्यात आलेली आहे. तद्नंतर दरवर्षी सदर वैदयकीय अधिकारी व परिचारीका यांना एक दिवसाचा खंड देवून पुर्न-नियुक्ती आदेश देण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने महासभा ठराव क्र.३८ दि.२९/१२/२०२३ अन्वये सदर अधिकारी व कर्मचारी यांना दि.०२/०१/२०२४ ते दि.३१/१२/२०२४ अन्वये पुर्न-नियुक्ती देण्यात आलेली होती. परंतु सदरच्या कालावधीचा करार दि.३१/१२/२०२४ रोजी संपुष्टात येत असल्याने वर नमुद कर्मचारी यांनी त्यांची पुढील पुन:र्नियुक्ती मिळणेबाबत अर्ज सादर केलेले आहे.

वर नमुद कार्यरत असलेले वैदयकीय अधिकारी व परिचारीका यांचे नांवे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्रं. | वैद्यकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नांव | कार्यरत असलेल्या हेल्थपोस्ट व दवाखान्याचे नांव |
|---|---|---|
| १ | डॉ.पल्लवी प्रभाकर नारखेडे, वैद्यकीय अधिकारी | शाहिर अमर शेख दवाखाना, सुभाष चौक हेल्थपोस्ट |
| २ | डॉ.पल्लवी किसनराव पाटील, वैद्यकीय अधिकारी | म.मो.मुलतानी दवाखाना, मेहरूण गावठाण हेल्थपोस्ट |
| ३ | डॉ.सोनल गिरीष जोशी, वैद्यकीय अधिकारी | नानीबाई अग्रवाल दवाखाना, इंडिया गॅरेज हेल्थपोस्ट |
| ४ | डॉ.सायली चंद्रकांत पवार, वैद्यकीय अधिकारी | शिवाजी नगर हेल्थपोस्ट |
| ५ | योगीता बबन बाविस्कर , परिचारिका | पिंप्राळा हुडको दवाखाना, पिंप्राळा हेल्थपोस्ट |

वर नमुद १ ते ५ कर्मचारी हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी कार्यरत असून त्या ठिकाणी OPD, गरोदर माता (ANC) यांची दैनंदिन तपासणी तसेच वेळोवळी राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यात येत असतात. उदा. नियमित लसीकरण , वार्षिक लसिकरण मोहिम, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना, मिशन इंद्रधनुष्य यासारख्या कार्यक्रमांसाठी आपली नित्य सेवा देत असतात.

वैदयकीय अधिकारी यांना दरमहा रु.४२,०१३/- व परिचारीका यांना रु.१२,८३७/- असे वेतन दरमहा मिळत आहे. सदर अधिकारी कर्मचारी यांना कोणताही भत्ता, एनपीए, टीएडीए, घरभाडे तसेच भविष्य निर्वाह निधी इ. लाभ दिला जात नाही. तरी चार वैदयकीय अधिकारी व एक परिचारीका यांनी सन २०२५ साठी २०% पगार देणेबाबतची विनंती केली आहे.

उपरोक्त RCH Phase-२ चार वैदयकीय अधिकारी व एक परिचारीका यांचा करार दि.३१/१२/२०२४ रोजी संपुष्टात येत असुन त्यांना दि.०१/०१/२०२५ रोजी एक दिवसांचा खंड देऊन दि.०२/०१/२०२५ ते दि.३१/१२/२०२५ या कालावधीसाठी मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता पुर्न-नियुक्ती देणे आवश्यक आहे.

तसेच सदरचा खर्च RCH कर्मचारी वेतन मनपा हिस्सा या लेखा शिर्षाखाली करण्यात येईल. या लेखाशिर्षावर सन २०२४-२५ या वर्षाकरीता रक्कम रु.२५ लक्ष मात्रची अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम | सद्यस्थितीत असलेले मानधन | १५% नुसार नुसार वाढीव मानधन | पुर्ननियुक्तीचा कालावधी व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.पल्लवी प्रभाकर नारखेडे | वैद्यकीय अधिकारी | ४२०१३/- | ४८३१५/- | दि.०२/०१/२०२५ ते दि. ३१/१२/२०२५ |
| २ | डॉ.पल्लवी किसनराव पाटील | वैद्यकीय अधिकारी | ४२०१३/- | ४८३१५/- | |
| ३ | डॉ.सोनल गिरीष जोशी | वैद्यकीय अधिकारी | ४२०१३/- | ४८३१५/- | |
| ४ | डॉ.सायली चंद्रकांत पवार | वैद्यकीय अधिकारी | ४२०१३/- | ४८३१५/- | |
| ५ | योगीता बबन बाविस्कर | परिचारिका | १२८३७/- | १४७६३/- | |

आर.सी.एच.फेज दोन अंतर्गत कार्यरत असलेले चार वैदयकीय अधिकारी व एक परिचारीका यांचा कार्यकाळ दि.३१/१२/२०२४ रोजी संपुष्टात येत असल्याने दवाखाना विभागातील कामाची निकड लक्षात घेता त्यांना दि.०१/०१/२०२५ रोजी एक दिवसाचा खंड देऊन दि.०२/०१/२०२५ ते दि.३१/१२/२०२५ रोजी या कालावधी करीता वैदयकीय अधिकारी व परिचारीका यांनी मागणी केलेल्या २०% ची मानधनाची वाढ बाबतची विनंती लक्षात घेता त्यांना एकुण मानधनावर १५% मानधन वाढ करून पुर्न-नियुक्ती देणेस मान्यता मिळण्यासाठी प्रमुख वैदयकीय अधिकारी, दवाखाना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

तथापि जळगांव शहर महानगरपालिकेने यापुर्वी १) महासभा ठराव क्रं.९७९ दि.२३/१२/२०२२ अन्वये दि.०३/०१/२०२३ ते दि.३१/१२/२०२३ तसेच २) प्रशासक ठराव क्रं.३८ दि.२९/१२/२०२३ अन्वये दि.०२/०१/२०२४ ते दि.३१/१२/२०२४ पावेतो पुर्न-नियुक्ती देतांना सदर दोन्ही कालावधीकरीता १०% प्रमाणे उपरोक्त वैदयकीय अधिकारी व परिचारीका यांचे मानधनात वाढ केलेली आहे. त्यानूसारच दि.०२/०१/२०२५ ते दि.३१/१२/२०२५ या कालावधीसाठी सदयास्थितीत असलेल्या मानधनात १०% प्रमाणे वाढ करणेस तसेच दि.०१/०१/२०२५ रोजीचा एक दिवसाचा खंड देवून दि.०२/०१/२०२५ ते दि.३१/१२/२०२५ पावेतो पुर्न-नियुक्ती देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३०** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- ०३** **प्रशासक ठराव क्र.:- २०८** **दिनांक :-०९/१२/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचेकडिल जा.क्रं./म.बा.क.वि./१४/२०२४-२५ दि.२८/०२/२०२४
३. उपायुक्त (सा.क.) यांचा दि.२८/११/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.२८/११/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव म.न.पा. संचलित मराठी माध्यमातील व सेमी इंग्रजी माध्यमातील तात्पुरत्या स्वरूपातील मानधनावरील नियुक्त बालवाडीतील शिक्षीका व मदतनीस यांच्या नियुक्ती आदेशाचा कालावधी दिनांक ३०/११/२०२४ रोजी समाप्त झाला आहे/ संपुष्टात आला आहे. या प्रस्तुत प्रकरणी / या विषयासंदर्भात मागील नस्तींचे अवलोकन केले असता ६ महिन्यांचे नियुक्तीनंतर २-३ दिवसांचा खंड देवुन (म्हणजे त्यांना २-३ दिवसांची त्यांची सेवा खंडीत करून) दिनांक ०४/१२/२०२४ ते १५/०४/२०२५ पावेतो उक्त वर नमुद आदेशातील मराठी माध्यमातील व सेमी इंग्रजी माध्यमातील तात्पुरत्या स्वरूपातील मानधनावरील नियुक्त केलेल्या बालवाडीतील शिक्षीका व मदतनीस यांना सर्व अटी व शर्तीनुसार तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर नवीन नियुक्ती आदेश देणेबाबत मा.महासभा/प्रशासक ठरावान्वये मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका संचलित बालवाडया हया महिला व बालकल्याण विभागामार्फत चालविल्या जात आहे. त्यानुसार सेमी इंग्रजी माध्यम बालवाडीच्या १९ शिक्षिका व ९ मदतनीस यांची आयुक्त यांचेकडील आदेश क्र./ ज.श.म.न.पा./म.बा.क./बालवाडी १०२८ दिनांक ०४/०७/२०२४ अन्वये व मराठी माध्यम बालवाडीच्या १० शिक्षिका व ९ मदतनीस यांची आयुक्त यांचेकडील आदेश क्र./ज.श.म.न.पा./म.बा.क./बालवाडी १०२९ दिनांक ०४/०७/२०२४ चे आदेशान्वये दिनांक १६/०४/२०२४ ते दिनांक १४/०६/२०२४ या कालावधीतील उन्हाळी सुटीतील त्यांची सेवा खंडीत करुन बालवाडी शिक्षिका व मदतनीस या पदासाठी दिनांक १५/०६/२०२४ ते दिनांक ३०/११/२०२४ पावेतो महासभा/प्रशासक ठरावाच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन सर्व अटी व शर्तीनुसार व त्या मान्य असलेबाबत रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर विहित बंधपत्र, हमीपत्र त्यांचेकडुन करुन घेवुन त्यांना तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर नियुक्ती आदेश देण्यात आलेले होते. त्यास महासभा/ प्रशासकीय ठराव क्र.१०८ दिनांक १९/०७/२०२४ अन्वये ठराव पारीत करुन प्रशासकीय ठरावान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

मा.उपसंचालक म.न.पा. प्रशासन संचालनालय यांचेकडील आदेश क्र.MCN/१७६१/प्र.क्र./१५१/११/०४ दि.१७ सप्टेंबर १९९२ अन्वये बालवाडयांना कायमस्वरुपी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. महासभा ठराव क्र.११७१ दि.०७/०७/२०२३ नुसार बालवाडी शिक्षिका यांचे मानधन रु.१०,०००/- व मदतनीस यांचे मानधन रु.५५००/- मात्र मंजूर करण्यात आलेले असुन त्यांच्या मानधनाचा खर्च हा म.न.पा.चे अंदाजपत्रकीय लेखाशिर्षकातील महिला व बालकल्याण निधीचे ५% राखीव मंजुर निधीतुन केला जातो.

जळगांव म.न.पा. संचलित मराठी माध्यमातील व सेमी इंग्रजी माध्यमातील तात्पुरत्या स्वरुपातील मानधनावरील नियुक्त बालवाडीतील शिक्षिका व मदतनीस यांच्या नियुक्ती आदेशाचा कालावधी दिनांक ३०/११/२०२४ रोजी समाप्त झाला आहे. / संपुष्टात आला आहे. ६ महिन्यांचे नियुक्तीनंतर २-३ दिवसांचा खंड देवुन (म्हणजे त्यांना २-३ दिवसांची

त्यांची सेवा खंडीत करुन) दिनांक ०४/१२/२०२४ ते दि. १५/०४/२०२५ पावेतो उक्त वर नमुद आदेशातील मराठी माध्यमातील व सेमी इंग्रजी माध्यमातील तात्पुरत्या स्वरुपातील मानधनावरील नियुक्त केलेल्या बालवाडीतील शिक्षिका व मदतनीस यांना सर्व अटी व शर्तीनुसार तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नवीन नियुक्ती देणे उचित राहील. म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधील तरतुदीनुसार पुन:श्च तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती आदेश देणे आवश्यक असल्याने दिनांक ०४/१२/२०२४ ते दिनांक १५/०४/२०२५ या कालावधीसाठी दिनांक ०४/०७/२०२४ च्या दोनही आदेशांमधील नमुद मराठी माध्यमाच्या १० शिक्षिका व ९ मदतनीस तसेच सेमी इंग्रजी माध्यमाच्या १९ शिक्षिका व ९ मदतनीस यांना सर्व अटी शर्तीनुसार तात्पुरत्या स्वरुपात दिनांक ०४/१२/२०२४ ते दिनांक १५/०४/२०२५ या कालावधीसाठी मानधन तत्वावर नियुक्ती आदेश देणे व मानधनासाठी दरमहा येणारा खर्च रु.३,८९,०००/- मात्रस मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांचे दिनांक ०४/१२/२०२४ ते दिनांक १५/०४/२०२५ पावेतोचे मानधनावर अंदाजित खर्च एकुण रक्कम रु.२१,३९,५००/- मात्र इतका येईल. त्यानुसार म.न.पा. संचलित बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांना दिनांक ०४/१२/२०२४ ते दिनांक १५/०४/२०२५ या कालावधीत मानधनासाठी दरमहा येणारा खर्च हा म.न.पा. अंदाजपत्रकीय लेखा शिर्षकातील महिला व बालकल्याण करीताचे ५% राखीव मंजुर निधीमधुन खर्च करणेस व वरील प्रमाणे नियुक्ती आदेश देणेस मान्यता मिळण्यासाठी अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३०** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- ०४** **प्रशासक ठराव क्र.:- २०९** **दिनांक :-०९/१२/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडिल जा.क्रं./आस्था./२५७९/२०२४-२५ दि.०३/१२/२०२४

३. उपायुक्त (सा.प्र.) यांचा दि.०२/१२/२०२४ चा अभिप्राय

४. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.०२/१२/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** श्रीमती माधुरी राहूल सावळे, लिपीक-टंकलेखक यांची मालेगांव महानगरपालिकेतून जळगांव शहर महानगरपालिकेत बदली होणे बाबत.

---

वाचा क्र.१ व आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

आयुक्त तथा प्रशासक, मालेगांव महानगरपालिका यांचे जा.क्र./मनपा/आस्था/१८०७ दि.१४/११/२०२४ च्या पत्रानुसार श्रीमती माधुरी राहुल सावळे, लिपीक-टंकलेखक यांची मालेगांव महानगरपालिकेतून जळगांव शहर महानगरपालिकेतील आस्थापनेवर कायम स्वरुपी समावेशन बाबत / बदली होणे बाबत पत्रात नमूद आहे.

श्रीमती माधुरी राहुल सावळे यांची मालेगांव महानगरपलिकेत दिनांक १५/११/२०२२ च्या आदेशान्वये लिपीक-टंकलेखक या पदावर (भ.ज.क.) या प्रवर्गातून अनुकंपा तत्वावर नियुक्ती झालेली आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेत दिनांक १६/०२/२०२३ च्या मंजुर आकृतीबंधानुसार लिपीक संवर्गाचे २०५ पदे मंजुर असून ऑक्टोबर २०२४ अखेर कार्यरत १०७ पदे असून लिपीक सवंर्गातील ९८ पदे रिक्त आहे. तसेच जळगांव महानगरपालिकेच्या यापुर्वी मंजुर बिंदु नामावलीनुसार भ.ज.क. प्रवर्गातील सरळसेवाकरिता आज रोजी (०२) दोन पदे रिक्त असल्याचे दिसून येते. यापैकी एका रिक्त पदावर श्रीमती माधुरी राहुल सावळे यांना शासन निर्णय झाल्यास मालेगांव महानगरपालिकेतून जळगांव मनपा आस्थापनेवरील लिपीक पदावर कायमस्वरुपी समावून घेता येईल. याकरिता प्रशासकीय ठराव आवश्यक असून ठराव झालेनंतर मालेगांव महानगरपालिकेला ना-हरकत दाखला (NOC) देता येईल. सदर प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३०** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०५** **प्रशासक ठराव क्र :- २१०** **दिनांक :-०९/१२/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहा.आयुक्त, आरोग्य विभाग यांचेकडिल जा.क्र./आरोग्य वि./८६१/२०२४-२५ दि.०६/१२/२०२४

३. उपायुक्त (सा.प्र.) यांचा दि.०५/१२/२०२४ चा अभिप्राय

४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०५/१२/२०२४ चा अभिप्राय

५. आयुक्त यांचा दि.०५/१२/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०१६ नुसार जळगांव शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ५ वर्ष कालावधीसाठी ... १. घंटागाडीव्दारे शहरातील वार्ड निहाय दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा कचरा, रस्त्यावरील कचरा तसेच उपहारगृह, दुकाने, व्यापारी संकुले, उदयाने इ. ठिकाणाचा घनकचरा (ओला व सुका) वेगवेगळा संकलन करुन ट्रान्सफर कलेक्शन सेंटर येथे रिफ्युज कॉम्पॅक्टरमध्ये लोड करुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पापर्यंत वाहतूक करणे. २. शहरातील वार्ड निहाय दैनंदिन रस्ते, गटार, व्यापारी संकुले इ. साफ सफाई करणेकामी ५०० कामगार पुरवठा करणेसाठी अभिकर्त्याची नेमणूक करणे करिता ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.

---

वाचा क्र.१ व सहा.आयुक्त, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांना जळगांव शहरातील घनकचरा संकलन व वाहतूक करणे तसेच दैनंदिन साफसफाई करिता ४०० कामगार पुरवठा करणे कामी ५ वर्षाकरिता मक्ता देण्यात आलेला असून सदर मक्त्याची मुदत दि.१५/०८/२०२४ रोजी संपुष्टात आलेली असून पुढील ई-निविदा प्रक्रिया होई पावेतो महासभा प्रशासक ठराव क्रं.११८ दि.१९/०७/२०२४ अन्वये आरोग्य विभागाकडील जा.क्र./४७७/२०२४ दि.०६/०८/२०२४ नुसार मुदतवाढ देण्यात आलेली आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ आचार संहिता शितील झाल्यामुळे फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

सदरचा मक्ता संपुष्टात येण्याच्या पुर्वी विहित कार्यपध्दतीने नविन अभिकर्त्याची नेमणूक करणे क्रमप्राप्त आहे. त्याअुषंगाने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेस घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) व ‘Transfer Station’ करिता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी All India Institute of Local Self Government,Pune संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचे घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प (DPR) प्राप्त अहवालानुसार जळगांव शहराचे एकूण क्षेत्रफळ ६८.२४ स्के. कि.मी. असून शहरातील लोकसंख्या सन-२०२४ मध्ये ६,०४,०८२ असून मिळकतींची संख्या अदमासे १,२०,१६४ असून शहरात दैनंदिन निर्माण होणारा कचरा २८३.९१ मे.टन (४७० ग्रेम प्रती व्यक्ती) असे नमुद केलेले आहे.

जळगांव शहरातील प्रभाग क्र.१ ते ४ अंतर्गत १९ वार्ड (अ,ब,क,ड) असून यापैकी ०९ वार्डामध्ये दैनंदिन रस्ते व गटार साफसफाई म.न.पा.च्या आस्थापनासूचीवरील ४३५ कायम कामगार व ४५ मोकादम यांचेमार्फत करण्यात येते. तसेच उर्वरित १० वार्डामध्ये दैनंदिन रस्ते व गटार साफसफाईचे काम मक्तेदाराने पुरवठा केलेल्या ४०० कामगार असे एकुण- ८८० कामगारांकडून शहरातील दैनंदिन साफसफाईचे काम करण्यात येत आहे. तसेच मक्तेदार मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांचेकडून घंटागाडीव्दारे शहरातील वार्डनिहाय दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा कचरा, रस्त्यावरील / उघडयावरील कचरा तसेच उपहारगृह, दुकाने, व्यापारी संकुले, उदयाने इ. ठिकाणाचा घनकचरा (ओला व सुका) वेगवेगळा संकलन करुन वाहतूक करण्यात येत आहे.

सन-२०२४-२५ ते सन-२०३०-३१ या ५ वर्ष कालावधीकरिता नविन अभिकर्त्याची नियुक्ती करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

करिता शहर अभियंता यांचेकडून दि.११/०३/२०२४ रोजीचे प्राप्त अहवालानुसार जळगांव शहरातील एम.आय.डी.सी. परिसर वगळून रस्ते व गटारींची माहिती खालील प्रमाणे आहे.

| डांबरी रस्ते | कॉंक्रीट रस्ते | खडीचे रस्ते | कच्चे रस्ते | पक्की गटार | कच्ची गटार |
|---|---|---|---|---|---|
| ३५० कि.मी | ८८ कि.मी. | ४५ कि.मी. | २० कि.मी. | ३८६ कि.मी. | २४५ कि.मी. |

शासन परिपत्रक क्र.जीईएन-१०८९ / ७४४ /सीआर. २३५/८९/नवि.१४ दि.१४ ऑगष्ट १९९० अन्वये रस्ते सफाई करीता ३००० चौ.मि. / प्रति कामगार व गटार सफाई करीता ३०० मी. लांबीला / प्रति कामगार शासन मार्गदर्शक सुचनेनुसार अपेक्षीत आहे.

तथापी जळगांव शहरातील कच्चे रस्ते वगळून उर्वरित ४८३ कि.मी. चे रस्ते सफाई करीता किमान ३००० चौ.मि. / प्रति कामगार या प्रमाणे गृहित धरुन (४८३ कि.मी. X ७ मी. सरासरी रस्त्याची रुंदी = ३३८१ स्के. कि.मी.करीता) ११२७ झाडू कामगार अपेक्षीत आहेत. तसेच शहरातील ६३१ कि.मी. गटार सफाई करीता किमान ३०० मी. लांबीला / प्रति कामगार या प्रमाणे गृहित धरुन २१०३ गटार कामगार अपेक्षीत आहे. असे एकूण ११२७ + २१०३ = ३२३० कामगार उक्त शासन परिपत्रकानुसार संपुर्ण शहरातील रस्ते व गटार सफाई करीता अपेक्षीत आहेत.

शहरातील दैनंदिन निघणारा घनकचऱ्याची माहिती

| सन | शहरातील दैनंदिन घनकचरा (टन) | एम.आय.डी.सी. भागातून निघणारा दैनंदिन घनकचरा | वाढीव क्षेत्रातून निघणारा दैनंदिन घनकचरा | एकूण दैनंदिन निघणारा घनकचरा |
|---|---|---|---|---|
| २०२४-२५ | २८४ टन | २० टन | -- | ३०४ टन |

अभिकर्त्याला पुरविण्यात येणाऱ्या म.न.पा.वाहनांची माहिती

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | आज रोजी कार्यान्वीत वाहने | सन-२०२४-२५ ते सन-२०३०-३१ साठी आवश्यक वाहने | मक्तेदार यांनी घ्यावयाची वाहने |
|---|---|---|---|---|
| १. | गार्बेज हॉपर | ८४ | १०५ | २१ |
| २. | कॉम्पॅक्टर मोठे | ७ | ९ | ० |
| ३. | कॉम्पॅक्टर मिनी | ० | ६ | ० |
| ४. | टिप्पर | ६ | ६ | ० |
| ५. | स्किपलोडर | ३ | ३ | ० |
| ६. | टाटा ४०७ पिकअप | ९ | ९ | ० |
| ७. | फ्रंट एन्ड लोडर | ४ | ४ | ० |
| एकूण- | - | ११३ | १४२ | २१ |

सन-२०२४-२५ पासून उपलब्ध वाहन संख्या व्यतिरिक्त सन-२०३०-३१ या कालावधीसाठी लागणारी गॉर्बेज हॉपर (क्षमता ३.२ क्यु.मी.) २१ अतिरिक्त वाहने व ५० ढकलगाडी अभिकर्त्यास स्वत: उपलब्ध करावी लागतील.

कचरा संकलन व वाहतूक निविदेतील टिपींग फी चे दरात कपात होणेसाठी वरील म.न.पा.ची कार्यरत असलेली ११३ वाहने अभिकर्त्यास ५ वर्ष कालावधीसाठी विनामुल्य वाहन पुरविण्यात येणार असून कामाचा कालावधी संपल्यानंतर वाहने चालू व सुस्थितीत म.न.पा.स परत करणे बाबतचे धोरण निश्चित करुन त्या अनुषंगाने निविदेत समावेश करण्यात आलेला आहे. तसेच वाहन विभागाच्या अभिप्रायानुसार आज रोजी कार्यरत असलेल्या ११३ वाहनांचा घसारा वजा जाता मुल्यांकन रक्कम रु.३,५५,२३,३२१/- मात्र आहे.

ऑल इंडिया इंस्टिटयुट ऑफ सेल्फ गव्हर्नमेंट, नाशिक यांचेकडून ‘Transfer Station’ (DPR) यांचे प्राप्त झालेल्या अहवालात नव्याने मोठे कॉम्पॅक्टर- २ नग (क्षमता १४ क्यु.मी.) व मिनी कॉम्पॅक्टर- ६ नग (क्षमता ७ क्यु.मी.) चा समावेश करण्यात आलेला असून सदरची वाहने म.न.पा.तर्फे खरेदी केल्यानंतर भविष्यात अभिकर्त्याला कचरा संकलन करण्याकरिता वरील धोरणानुसार देता येईल. तो पावेतो अभिकर्त्याने पर्यायी व्यवस्था करणे बंधनकारक आहे.

घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ नुसार **१.** घंटागाडीव्दारे शहरातील वार्ड निहाय दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा कचरा, रस्त्यावरील कचरा तसेच उपहारगृह, दुकाने, व्यापारी संकुले, उदयाने इ. ठिकाणाचा घनकचरा (ओला व सुका) वेगवेगळा संकलन करुन ट्रान्सफर कलेक्शन सेंटर येथे रिफ्युज कॉम्पॅक्टरमध्ये लोड करुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पापर्यंत वाहतूक करणे कामी दरमहा अंदाजे रक्कम रु.१,२४,६७,०४०/- प्रती वर्ष रु.१४,९६,०४,४८०/- असे ५ वर्ष कालावधीकरिता अंदाजे रक्कम रु.७४,८०,२२,४००/- खर्च अपेक्षीत आहे.

२. शहरातील वार्ड निहाय दैनंदिन रस्ते, गटार, व्यापारी संकुले इ. साफ सफाई करणेकरीता ५०० कामगार पुरवठा करणे कामी दरमहा अंदाजे रक्कम रु.१,३९,६५,०००/-, प्रती वर्ष रु.१६,७५,८०,०००/- असे ५ वर्ष कालावधी करिता अंदाजे रक्कम रु.८३,७९,००,०००/- खर्च अपेक्षीत आहे.

| अ.क्र. | घटक | प्रती महा | प्रती वर्ष | ५ वर्षाकरीता |
|---|---|---|---|---|
| १. | घंटागाडीव्दारे शहरातील वार्ड निहाय दैनंदिन कचरा संकलन व वाहतूक करणे. | रु.१,२४,६७,०४०/- | रु.१४,९६,०४,४८०/- | रु.७४,८०,२२,४००/- |
| २. | शहरातील वार्ड निहाय दैनंदिन रस्ते, गटार, इ. साफसफाई करिता ५०० कामगार पुरवठा करणे. | रु.१,३९,६५,०००/-, | रु.१६,७५,८०,०००/- | रु.८३,७९,००,०००/- |
| | एकूण- | रु.२,६४,३२,०४०/- | रु.३१,७१,८४,४८०/- | रु.१५८,५९,२२,४००/- |

उपरोक्त प्रमाणे ५ वर्ष कालावधीसाठी १) घनकचरा संकलन वाहतूकीसाठी अंदाजे रक्कम रु.७४,८०,२२,४००/- २) शहरातील दैनंदिन साफसफाई करिता ५०० कामगार पुरवठा करणेसाठी अंदाजे रक्कम रु.८३,७९,००,०००/- खर्च अपेक्षीत आहे, असे एकूण रक्कम रु.१५८,५९,२२,४००/- खर्च अपेक्षित आहे. तसेच महानगरपालिकेस पुढील ५ वर्ष कालावधीसाठी १) घनकचरा संकलन व वाहतूकीच्या टिपींग फि मध्ये कामाचे एक वर्ष संपल्यानंतर दुसऱ्या वर्षापासून नैसर्गिक दरवाढ विचारात घेऊन निविदेतील मजुर दरावर ५% दरवाढ अभिकर्त्यास महापालिकेकडून देणे अपेक्षीत आहे. २) अभिकर्त्यामार्फत महानगरपालिकेस पुरवठा करणाऱ्या कामगारांना शासनाच्या किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ प्रमाणे कामगारांचे किमान वेतन दरात वेळोवेळी होणारी वाढ अभिकर्त्याला देणे अपेक्षीत आहे. सदरचा खर्च शासनाकडून निधी उपलब्धतेनुसार १५ वित्त आयोगाच्या बंधनकारक अनुदानातून तसेच म.न.पा. निधीतुन प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदयस्थितीत १५ वित्त आयोगाच्या प्राप्त निधीपैकी रु.५१ लक्ष शिल्लक असुन सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकात मनपा निधी अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन या लेखाशिर्षाखाली रु.२५ कोटी मात्रची तरतुद प्रस्तावीत करण्यात येईल. तसेच १५ व्या वित्त निधीमध्ये पुरेसा निधी उपलब्ध न झाल्यास म.न.पा. निधी अंतर्गत दरवर्षी करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतूदी मधून खर्च भागवण्यात येईल.

घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०१६ नुसार ५ वर्ष कालावधीसाठी … १. घंटागाडीव्दारे शहरातील वार्ड निहाय दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा कचरा, रस्त्यावरील कचरा तसेच उपहारगृह, दुकाने, व्यापारी संकुले, उदयाने इ. ठिकाणाचा घनकचरा (ओला व सुका) वेगवेगळा संकलन करुन ट्रान्सफर कलेक्शन सेंटर येथे रिफ्युज कॉम्पॅक्टरमध्ये लोड करुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पापर्यंत वाहतूक करणे. २. शहरातील वार्ड निहाय दैनंदिन रस्ते, गटार, व्यापारी संकुले इ. साफसफाई करणेकामी ५०० कामगार पुरवठा करणे कामी जाहिर ई-निविदा मागवुन अभिकर्त्याची नेमणुक करणे आवश्यक आहे.

जाहिर ई-निविदा मागवुन अभिकर्त्याची नेमणुक करणे कामी निविदा समितीच्या चर्चेअंती प्रारुप ई-निविदेचा अटी व शर्तीचा मसूदा तयार करण्यात आलेला आहे. सदर ई-निविदेचा मसूदास ई-निविदा समितीची मान्यता मिळालेली आहे. करिता शासनाच्या संकेतस्थळावर व जाहिर निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करणेस तसेच प्रस्तावित कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेसाठी सहा.आयुक्त, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. तथापी विभागाने नियमाप्रमाणे ई-निविदेतील अटी-शर्ती निश्चीत करुन घेवून निविदा तात्काळ प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**